नगर परिषद कार्यालय, वाशिम.

E-mail-mcwashim@gmail.com
दूरध्वनी क्रमांक ०७२५२-२३२००९
फॅक्स क्रमांक ०७२५२-२३१०४१

जा.क्र.:- नपवा /नियो/कार्या-१४/बा.परवानगी/ 294 / २०१८
नगर परिषद कार्यालय,वाशिम जि.वाशिम .
दिनांक १९/०४/२०१८

परिशिष्ट - ड

(उपविधी नियम न-१०.१)

जोत्या पर्यंत बांधकाम परवाना

प्रेषक

नियोजन प्राधिकरण
वाशिम नगर परिषद,वाशिम

श्री प्रशांत लालचंद जोगी व इतर, मुखत्यारपत्र धारक श्री प्रशांत ला. जोगी
रा. सिव्हिल लाईन , वाशिम
जिल्हा वाशिम

संदर्भ :- आपला दि. २०.०२.२०१८ रोजीचा अर्ज.

आपणांस कळविण्यात येते की, आपले बांधकाम प्रकरण दिनांक **20.02. 2018** च्या अर्जा नूसार मौजे वाशिम येथील **SH. NO 36** मधील भूखंड क्र. **Plo (C.T.S. No. 930)** वार्ड क्र . **03** महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम,१ ९६६ चे कलम, ४५ अन्वये खालील अटी /शर्तीना अधीन राहून बांधकाम प्रारंभ परवाना देण्यात येत आहे.

अटी/शर्ती :-

१) सदर बांधकाम प्रारंभ परवाना इमारतीच्या जोत्या पर्यंतचे (Plinth Level) आहे .जोत्या पर्यंत (Plinth Level) बांधकाम झाल्यानंतर Appendix 'F'मध्ये मुख्याधिकारी, नगर परिषद वाशिम यांना तसे कळविणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर इमारतीचे पूढील बांधकामास नाहरकत देण्यात येईल .

२) बांधकान मंजूरी आदेश प्राप्त झाल्याचे तारखेपासुन सदर मंजूरी एका वर्षा पर्यंत वैध राहिल.

३) बांधकाम परवानगी केवळ वाणिज्य/ निवासी इमारतीचे बांधकाम बेसमेंट/पार्कींग तळ मजला/ पहिला मजला/दूसरा मजला/ तिसरा मजला करिता आहे .

४) नकाशात दूरुस्त केल्याप्रमाणे बांधकाम करावे लागेल.

५) बांधकामात कोणत्याही प्रकारचा फेरफार मुख्य अधिकारी यांचे पूर्व परवानगी शिवाय करता कामा नये

६) बांधकाम चालु केल्याचा व पूर्ण झाल्याचा वेगवेगळा अहवाल नगर परिषदेस देणे बंधनकारक राहील.

७) बांधकाम पूर्ण झाल्यानंतर या कार्यालया कडून वापर प्रमाणपत्र प्राप्त करावे .

८) इमारत बांधकाम पूर्ण झाल्यानंतर मुख्याधिकारी यांचा वापर प्रमाणपत्र मिळाल्या शिवाय इमारत वापर सुरु करण्यात येवू नये .

९) जागेच्या मालकी हक्का बाबत अथवा जागेच्या हद्दी बाबत कोणत्याही प्रकारचा वाद निर्माण झाल्यास त्यास अर्जदार जबाबदार राहील .

१०) रस्ता रुंदीकरणातील क्षेत्र नगर परिषदेकडे नोंदणीकृत बक्षीसपत्राद्वारे विनामूल्य हस्तांतरीत करुन देणे बंधनकारक आहे .

११) सांडपाणी व्यवस्थापनासाठी शुध्दीकरण पध्दतीने पूर्नवापर प्रक्रिया करण्यासाठी स्वतंत्र युनिट तयार करुन स्वयंपाक घरातील व न्हाणीघरा मधील पाण्याचा पूर्नवापर करणे बंधनकारक आहे.

१२) महाराष्ट्र विघटनशील व अविघटनशील कचरा(नियंत्रण) अध्यादेश,२००६ नुसार ठाकाव पदार्थगोळा

१३) सदर इमारती मध्ये महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ नूसार आवश्यक ती आग प्रतिबंधक उपाययोजना करण्यात यावी . सदर उपाययोजना करण्याकरिता मा. संचालक महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय मुंबई यांनी नियुक्त केलेल्या अभिकरणा मार्फत करण्यात यावी . सदर अभिकरण यांची यादी ही शासनाच्या www.mahafireservices. org.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

१४) प्रस्तावित बांधकाम हे भूकंप प्रतिरोधक असल्याची खात्री करुन घ्यावी व भूकंपा पासुन हानी होवू नये . याबाबत वृथा म्हणून इमारतीच्या स्थैर्याबाबत इमारतीचे R.C.C. डिझाइन सक्षम वास्तु विशारद यांचे कडुन करुन घ्यावे.

१५) प्रस्तावित बांधकामाच्या जागेमध्ये पावसाळी पाणी निचरा होण्याचे नैसर्गिक मार्ग/गटारे असतील तर ते अबाधित ठेवावेत किंवा त्यांची योग्य ती व्यवस्था करावी . कोणत्याही परिस्थितीत नैसर्गिक पाण्याचे मार्ग बंद करु नयेत .

१६) छतावरिल पाणी साठविण्या करिता रेन वाटर हार्वेस्टींग बंधनकारक राहील.

१७) सौर ऊर्जेवर पाणी तापविण्याची यंत्रणा बसवून विद्युत वापर कमी करण्याबाबत उपाययोजना करावी.

१८) बांधकामाचे परिक्षेत्रात महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम,१९७५ नूसार झाडे लावणे आपलेवर कायदेशिर बंधनकारक राहिल .

१९) प्लास्टीक वापराबाबत शासन व नगर परिषद यांचे कडून वेळोवेळी होणा-या आदेशाचे पालन करणे आपल्यावर बंधनकारक राहिल .

२०) सौर ऊर्जेवर पाणी तापविण्याची यंत्रणा बसवून विद्युत वापर कमी करण्याबाबत उपाययोजना करावी.

२१) सांडपाण्याची पाईप लाईन नगर परिषदेच्या प्रस्तावित भूयारी गटार योजनेच्या पाईप लाईनला जोडणे बाबतची तजविज करणे बंधनकारक असून याबाबत नगर परिषदे कडून वेळोवेळी केल्या जाणा-या सूचनांचे पालन करणे बंधनकारक आहे .

२२) इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर नगर परिषदेच्या पाणी पुरवठा योजनेची नळजोडणी घेणे बंधनकारक आहे अन्यथा भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येणार नाही .

२३) बांधकाम करतांना रहदारीस अडथळा होणार नाही याची दक्षता घ्यावी. साहित्य रस्त्यावर असल्यास नगर परिषदे कडे जमीन भाडे भरावे लागेल .

२४) पाण्याचा निच-या करिता आपणांस स्वखर्चाने पक्की नाली बांधून व्यवस्था करणे बंधनकारक असेल .

२५) बांधकामामुळे नगर परिषदेच्या रस्त्याचे नालीचे नुकसान झाल्यास त्याची आपणा कडून भरपाई केल्या जाईल.

२६) आपण दाखल केलेले कागदपत्रे, नकाशा खोटी अथवा दिशाभुल करणारी आढळल्यास सदर परवानगी रद् समाजण्यात यावे .

२७) कामाचा दर्जा वापरण्यात येणार साहित्य बाबत गुणवत्ते आपण स्वखर्चाने तपासणी करावी . याबाबतची जबाबदारी आपली राहिल .

२८) स्थावर संपदा (विनिमय व विकास) अधिनियम -२०१६ (महारेरा) कडे आवश्यक असल्यास नोंदणी करण्याची सर्वस्व जबाबदारी आपली राहील

मुख्य अधिकारी तथा
नियोजन प्राधिकारी
वाशिम नगर परिषद,वाशिम

प्रत :- कर विभाग, नगर परिषद वाशिम, यांना माहिती करिता रवाना

नगर परिषद वाशिम जि. वाशिम
MUNICIPAL COUNCIL WASHIM DIST. WASHIM

दुरध्वनी क्र. 07252 -232131 टोल फ्री क्र. - 1800 233 3127

ईमेल - coud.washim@maharashtra.gov.in वेब साईट - www.washimmahaulb.maharashtra.gov.in
ईमेल - mcwashim@gmail.com वेब साईट - www.washimmc.in

जा. क्र. नपवा/कार्या-14/बां.मुदतवाढ/ 830 2019 दि. 28/6/2019.

प्रति ,

श्री प्रशांत लालचंद जोगी व इतर
मुखत्यारपत्र धारक,श्री प्रशांत ला. जोगी
रा. सिव्हिल लाईन, वाशिम
जिल्हा वाशिम

विषय :- **बांधकाम परवानगीस मुदतवाढ मिळणे बाबत .**
मौजा वाशिम येथील शिट नं. 36 मधील सि.स.न. 930 वरील बांधकामास मुदतवाढ मिळणे बाबत.

संदर्भ :- 1)आपला दिनांक 26.03.2019 रोजीचा विनंती अर्ज
2) या कार्यालयाचे पत्र क्र. नपवा/नियो/ कार्या-14/ बां.प.215/2018 दि.19.04.2018 .

उपरोक्त विनंती अर्जाच्या अनुषंगाने आपणास मोजा वाशिम येथील शिट नं. 36 मधील सि.स.न. 930 वरील जागेत करावयाचे बांधकामास मुदतवाढ मागीतली आहे.

सदर जागेवर बांधकामास या कार्यालयाचे पत्र क्र.नपवा/नियो/कार्या-14/215/18, दि.19.04.2018 अन्वये बांधकाम परवानगी दिलेली आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, 1966 चे कलम 48 तसेच विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियवलीतील नियम क्र.6.9 अन्वये सदर बांधकाम परवानगीस **दि. 18.04.2020 पर्यंत मुदतवाढ** देण्यात येत आहे.

मुळ बांधकाम परवानगी मधील इतर सर्व अटी व शती लागू राहील.

मुख्याधिकारी तथा
नियोजन प्राधिकरण
नगर परिषद, वाशिम

Ismail- Building-per-01